10

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)




16 March 2020 Special Issue- 24 Vol. 2

## CONTRIBUTION OF TOURISM IN NATIONAL DEVELOPMENT ( CTND2020 )

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Editor**
Vice Principal Dr. U.S. Sawant

**Co- Editor's**
Dr. S.S. Shinde
Dr. S.M.Bindge

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 24 , Vol. 2
March 2020
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# INDEX


| | | |
|---|---|---|
| 1. | Study of Socio-Economic Importance of Tourism Place –Ajanta Ellora Aurangabad in Maharashtra State<br>*RB Yedatkar, **RS Sonwane, #VV Lute | 1 |
| 2. | Buddhist Caves in Mahad-Pale : A Cultural Heritage of Kokan<br>Dr. Dnyanoba T. Kadam | 7 |
| 3. | Present Scenario of Changing Nature of Tourism in India an overview<br>Dr. Bindge S. M. | 10 |
| 4. | Touriem Education Nature And Scope<br>Dr. Kshirsagar O. M. | 14 |
| 5. | Tourist Places in Beed District: A Geographical Review<br>Dr. Sawate S.R. | 17 |
| 6. | Adventure Tourism and Sports<br>Dr. Uday L Sahu, Dr. Bhalerao G.P. | 19 |
| 7. | Scope Of Tourism In Nanded District<br>*Dr. G.S. Patil* | 21 |
| 8. | Tourism Policy in India: An overview<br>Dr R R Pompalpalle | 24 |
| 9. | Natural Tourist Centers In Aurangabad District: A Geographical Study<br>Dr. Sunil Khandebharad | 28 |
| 10. | Rural Tourism In India : Opportunities & Challenges.<br>Mr.Govind Nivrutirao Phad | 34 |
| 11. | Rural Tourism Nature and Scope<br>Dr.Sureshkumar Kundlik Kamble | 37 |
| 12. | "The Geographical study of Tourist Destinations in Parbhani District"<br>Mr.Narwade M.V. and Mr. Munde G.R. | 39 |
| 13. | An Analytical Study On Contribution Of Tourism Industry In Indian Economy<br>Dr. H.S. Patange | 42 |
| 14. | पर्यटन की दृष्टि से उदगीर<br>प्रा. ठाकूर व्ही. सी | 46 |
| 15. | धर्मापुरी येथील मंदिरे : एक अभ्यास<br>सिंधु लोणकर | 48 |
| 16. | बौद्ध स्तुप सांची : एक अध्ययन<br>उषाताई लक्ष्मण मगरे | 50 |
| 17. | निसर्गाचा अद्भूत अविष्कार : सहस्रकुंड धबधबा<br>प्रा.किशन मिराशे | 53 |
| 18. | आदिवासी जमातीतील सांस्कृतिक नृत्य प्रकार आणि पर्यटन<br>शिवकुमार केशवराव पांचाळ | 55 |

Bhartiya Vyapari Education Society's Gondhor College, Degloor, Dist.Nanded

19. पर्यटन नियोजनाचे महत्त्व — एक अभ्यास
प्रा.डॉ.कोंडेकर आर.एस. 58

20. तेर - एक गौरवशाली नगर
डॉ. राखी सिद्राम सलगर 62

21. मराठवाड्यातील निवडक पर्यटन स्थळे
प्रा.डॉ.एच.टी.सातपुते 64

22. पर्यटन नियोजन एक अभ्यास
डॉ.साईनाथ शेटोड 67

23. परभणी जिल्ह्यातील ऐतिहासीक पर्यटन आणि वारसा स्थळे
प्रा.डॉ.राठोड यु. सी 70

24. राष्ट्रीय विकासात जगप्रसिध्द अजिंठा लेणींचे योगदान
डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे 73

25. "भारतीय ग्रामीण पर्यटन : एक दृष्टिक्षेप"
प्रा.डॉ.बी.एम.कांबळे 79

26. अजिंठा डोंगर रांगेतील ऐतिहासिक पर्यटनस्थळे
डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव 81

27. "मराठवाड्यातील ज्योतिलिंग, धार्मिक पर्यटन स्थळे"
डॉ. सौ. संगीता संदीप शिंदे 85

28. पर्यटन विकासासाठीच्या उपयायोजना व फायदे
प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू 87

29. कृषी पर्यटन : केल्याने देशाटन, मनुजा अंगी चातूर्य येतसे फार
प्रो.डॉ. देशमुख एम.व्ही. 91

30. अहमदनगरमधील सुप्रसिध्द धार्मिक वारसास्थळांचे सामाजविकासातील योगदान
श्री.प्रा.डॉ.आर.आर.मुटकुळे , प्रा. नवनाथ काशिनाथ वाव्हळ, 93

31. "औरंगाबाद : एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ"
डॉ. नितीन आहेर 99

32. 'ऐतिहासिक वारसा व पर्यटन'
प्रो.डॉ.दादाराव दत्तराव पानपट्टे 101

33. पर्यटन विकासात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे योगदान
डॉ. आर. एस. पारवे 104

34. नाट्यकला आणि पर्यटनाचा परस्पर अनुबंध
डॉ.वैशाली केशव बोदेले 108

35. स्थानिक इतिहासात पर्यटनाचे महत्व
डॉ.विजया साखरे 111

36. राष्ट्रीय विकासाचा आधार : कृषी पर्यटन
डॉ.जीवन सुदामराव गंगणे 113

37. "मराठवाड्यातील धार्मिक पर्यटन स्थळे"
प्रा. डॉ. उत्तम सिताराम कऱ्हाळे 116

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 24 , Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# पर्यटन विकासासाठीच्या उपाययोजना व फायदे

प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू
(इतिहास विभाग प्रमुख) , देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड.

मानवी जीवनात पर्यटनाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. पर्यटन हे एक दिवस ते एक वर्षापर्यंत केले जाऊ शकते. मानवाचे मन दैनंदिन कर्तव्यांमध्ये गुंतलेले असते. त्याचा मानवाला केंव्हातरी कंटाळा वाटतो. आणि तो मनाचे मनोरंजन करण्यासाठी पर्यटन करतो. हे पर्यटन कुण्याही उद्देशाचे असू शकते. प्राचीन काळात ऋषी मुनी हे सुध्दा पर्यटनाला महत्व देत होते. त्यांनी म्हटले की, 'पर्यटनाशिवाय असलेले मानवी जीवन हे अंध:कारमय असते.' सेंट ऑगस्टीनने म्हटले की, 'विश्व दर्शना शिवाय मानवाचे ज्ञान अर्धवटच आहे.' कारण पर्यटनामुळे मानवाच्या ज्ञानात भर पडतच असते. कुणी धार्मीक पर्यटन करतो. कुणी व्यावसाईक पर्यटन करतो. तर कुणी शैक्षणिक पर्यटन करतो. इत्यादी अनेक उद्देशाने प्राचीन काळापासुन वेगवेगळ्या देशातील प्रवाशी भारतात येतच राहिले. चीनी प्रवाशी, मध्यआशीयातील प्रवाशी, यूरोपातील प्रवाशी भारतात आले होते. याची इतिहासात अनेक उदाहरणे सापडतात.

जगभरातील विविध राष्ट्रांनी सध्या पर्यटन हा व्यवसाय बनविला आहे. ज्या राष्ट्रांकडे ऐतिहासीक, सांस्कृतीक, इत्यादी वारसा आहे. त्यांना जगाच्या पटलावर आणून पर्यटकांना आपल्याकडे आकर्षीत करण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्र करीत असतो. म्हणुन भारत सरकार, राज्य सरकारे यांनीही पर्यटकांना आकर्षीत करण्यासाठी भरपूर प्रयत्न चालविले आहेत. पण त्या मानाने भारतात फार कमी प्रमाणात पर्यटन होते म्हणून आणखी कांही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्या उपाययोजनांची माहिती मांडण्याचा हा एक प्रयत्न आहे.

**पर्यटन विकासासाठीच्या उपाययोजना :**

१) एखाद्या ठिकाणाहुन निघुन पर्यटक दुसऱ्या ठिकाणी जातो. तो पर्यटक वेगवेगळया दृष्टिकोणातुन पर्यटन करतो त्या पर्यटकांचे आवडीचे क्षेत्र किंवा उद्देश वेगवेगळे असतात. पर्यटनाचा जर विकास साधायचा असेल तर त्या येणाऱ्या पर्यटकांची आवड - निवड लक्षात घेतली पाहिजे आणि तसे विविध नैसर्गीक, सामाजिक, धार्मीक, सांस्कृतीक, कृषीविषयक इत्यादी असे पर्यटकांचे दृष्टिकोण लक्षात घेवून त्यानुसार पॅकेज बनवले पाहीजे. आणि त्या विविध दृष्टीकोणांची माहिती देणारी मार्गदर्शन केंद्रे व पर्यटन स्थळे निर्माण किंवा विकसीत केली पाहीजेत. त्यामुळे पर्यटकांची सोय होते. त्याचे मन प्रसन्न होते. समाधानी होऊन पर्यटक परत जातो. आणि त्याच्यासारखा समान दृष्टीकोण असलेल्या त्याच्या इतर नातेवाईक व मित्रांना तो सांगतो, परिणामी पर्यटनाचा विकास आपोआप होतो.

२) पर्यटकांना भारताकडे / आपल्याकडे आकर्षीत करण्यासाठी त्यांना पर्यटन पॅकेज योजना दिली पाहीजे. त्या पॅकेज योजनेमुळे पर्यटकांची बरीच सोय होते. त्यांचा वेळ व पैसा वाचतो. तो लोकांकडून लुबाडले जाण्यापासून वाचतो कमीत कमी वेळेत जास्त पर्यटनस्थळे तो पाहून घेवू शकतो. पॅकेज योजनेत पर्यटन केल्यामुळे त्याला पर्यटन स्थळांची यथोचीत माहितीही उपलब्ध गाईडकडून मिळत राहते. त्याला राहण्याची, खाण्याची सोय त्यातच मिळत असते म्हणून पर्यटकांनाही पॅकेज योजना आवडतात. म्हणून पर्यटकांना पॅकेज दिले तर पर्यटनाचा विकास निश्चीतच होतो.

३) भारतीय संस्कृतीत |अतिथी देव भव:| ला अतिशय महत्व आहे. म्हणजे आपल्याकडे येणाऱ्या /आलेल्या पाहुण्यांना देवाचे प्रतिरुप मानले जाते. म्हणून आपल्या भारतात किंवा पर्यटनस्थळी येणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांचा आपण मानसन्मान केला पाहिजे. त्यांच्या पर्यटन कालावधीकाळात त्यांची राहण्याची, जेवणाची, त्यांच्या सुरक्षेची काळजी घेतली पाहीजे. ही काळजी सरकार व भारतीय नागरीक हया दोघांनीही घेतली पाहिजे. त्यांच्या वास्तव्यकाळात पर्यटकांची मानसीकता येथे टिकून राहिली पाहीजे त्याला कंटाळवाणे किंवा असुरक्षीत वाटताच कामा नये तो आपल्या देशात किंवा गावी जाऊन पुन्हा आपल्या मीत्र किंवा नातेवाईकांसह आपल्याकडे येत राहिला पाहिजे. तरच पर्यटन विकास होईल.

४) आपल्याकडे येणाऱ्या देशी परदेशी पर्यटकांना आपण काही सवलतींची ऑफर दिली पाहिजे. कारण व्यवहारात प्रत्येक व्यक्ती बार्गेनिंग करतो. काहीतरी सवलत मिळाली पाहिजे ही त्याची अपेक्षा असतेच म्हणून प्रवाशी संस्थांनी, निवासी संस्थानी , सरकारने, स्थानिक स्वराज्य संस्थांनी अशा सवलतीच्या ऑफर्स दिल्या पाहिजे. पर्यटकांना राहण्याच्या, जेवणाच्या, वस्तुखरेदीच्या दरात सवलत दिली पाहिजे. कमी पैशात चांगल्या सोई देवून पर्यटकांना आपल्याकडे आकर्षीत केले तरच पर्यटन विकास गतीने होऊ शकतो.

५) पर्यटनाचा विकास घडवून आणण्यासाठी त्या-त्या देशाच्या पर्यटन विभागाची भुमीकाही अतिशय महत्वाची असते. पर्यटकांना पर्यटन स्थळी सेवा देणारे जे विविध घटक आहेत. त्यात लॉजवाले, हॉटेलवाले विविध गरजेच्या वस्तु विकणारे व्यावसाईक, स्थानिय वस्तुंचे निर्माण करणारे कारागीर, मनोरंजन व खेळ करणारे विविध कलाकार इत्यांदींच्या पर्यटन विभागाने कार्यशाळा किंवा त्यांचे प्रशिक्षण वर्ग घेवून त्यांना पर्यटकांसोबत कसे आचरण करायचे याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. स्थानिय वस्तु निर्माणाचे, हस्तकलेचे व्यावसाईक प्रशिक्षणही त्या परिसरातील लोकांना दिले पाहिजे स्थानिय व्यवसायातील शैलीचे प्रशिक्षणही स्थानिय लोकांना देणे आवश्यक आहे. त्यामुळे पर्यटकही खुश राहतील त्यांच्यात आपलेपणाची भावना वाढीस लागेल व त्यातून पर्यटन विकास होणे शक्य आहे.

६) पर्यटकांना पर्यटन स्थळी विविध सेवा उपलब्ध करुन देणारे अनेक घटक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पणे कार्य करीत असतात. काही सरकारी, खाजगी लोक, विविध संस्था किंवा सेवाभावी संघटना इ.असतात. सरकारतर्फे त्या विविध घटकांना नेहमी प्रोत्साहन मिळत राहिले

पाहीजे. सरकारने त्यांचीही मानसिकता टिकविली पाहीजे. त्यांना वेळप्रसंगी बँकाव्दारे सहज अर्थपुरवठाही केला पाहिजे. त्यांचे प्रबोधन वर्ग घेतले पहिजे. सरकारच्या प्रोत्साहनाने ते लोक आणखी उत्साहाने आपल्या सेवा वृध्दिंगत करतील आणि त्यातून पर्यटन विकास होणे सोपे होईल.

७) भारतातील आणि जगभरातील पर्यटकांना आपल्याकडे आकर्षीत करण्यासाठी आपल्याकडे जो काही नैसर्गिक आणि ऐतिहासीक वारसा आहे. त्यांचे जतन आणि विकास घडवून आणला पाहिजे. आपल्या देशात अनेक जंगले, अभयारण्ये आहेत. त्यांचे सुव्यवस्थीत निर्माण आणि विकास केला पाहिजे. त्यामध्ये असलेल्या प्राण्यांची, पक्ष्यांची त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. त्यांच्या चारा,अन्न, स्वच्छ पाण्याची सोय केली पाहीजे. वेगवेगळया देशातून नवनवीन आकर्षक प्राणी - पक्षी आणले पाहिजे. त्या प्राणी पक्ष्यांचे संरक्षण केले पाहिजे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षणही होते आणि पर्यटकांना आकर्षीतही करता येते. त्या प्राण्यांना पक्ष्यांना पाहण्याची लोकांची इच्छा होते. म्हणून त्यांच्यासाठी अभयारण्यात सुरक्षीत मार्गही बनविले पाहिजे. त्या सफरीदरम्यान पर्यटकांच्या सुरक्षेची काळजीही घेतली पाहिजे.

भारतात अनेक ऐतिहासिक वारसा असलेली स्थापत्ये, लेण्या, स्मारके, गड-किले, शैलशिल्पे, शैलचित्रे इत्यादी भरपूर आहेत. त्यांचे जतन, जिर्णोध्दार, संरक्षण, योग्य माहिती असलेले गाईड इत्यादी निर्माण केले पाहिजे. ती ऐतिहासिक वारसास्थळे पाहतांना गतकालीन इतिहास पर्यटकांच्या डोळ्यासमोर उभा राहिला पाहिजे. तरच पर्यटकांना तो ऐतिहासिक वारसा कळेल त्याबद्दल आपलेपणाची भावना निर्माण होईल, त्याबद्दल पर्यटकांना अभिमान वाटेल, पर्यटकाने खर्च केलेल्या पैशाचे चीज झाले असे त्याला वाटेल तो समाधानी होईल. भारत सरकारने कांहीच मोजक्या ऐतिहासिक वारसास्थळांकडे लक्ष दिले. च्याशिवाय आणखी भरपूर ऐतिहासिक वारसा स्थळे अजूनही अंधारातच आहेत. त्यांचाही विकास होने गरजेचे आहे.

ऐतिहासिक वारसा स्थळांबाबत लोकशिक्षण देणे हे सुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. त्यामुळे कांही समाजकंटकांकडून ऐतिहासिक वारसा स्थळांना पोहोचणारी इजा थांबेल. त्या लोकांत ऐतिहासिक वारसा स्थळाबाबत अभिमान निर्माण होईल. आपल्या ऐतिहासिक वारसा स्थळांचा विकास झाला पाहिजे. पर्यटक आपल्याकडे आला पाहिजे ही भावना त्यांच्या मनात निर्माण होईल. त्यातून पर्यटनाचा विकास होने सहज शक्य आहे.

८) भारतात जी कांही पर्यटन स्थळे आहेत. ती पाहण्यासाठी अनेक देशविदेशातून विद्यार्थी व कांही संशोधक मंडळी येतात. त्यांना सरकारद्वारे सोई-सुविधा-सवलती देने अत्यंत आवश्यक आहे. पण ह्याच बाबीकडे नेमके दुर्लक्ष झालेले आपल्याला दिसते. विद्यार्थी व संशोधक हे आर्थिकदृष्टया दुसऱ्यावर अवलंबून असतात. म्हणून त्यांना प्रवासाचे कंशेशन, पर्यटन स्थळी आवास व भोजन व्यवस्था माफक दरात मिळाली पाहिजे. कारण आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक बनतो. शिक्षणानंतर तो वेगवेगळ्या क्षेत्रात काम करतो. त्याला विद्यार्थी जिवनात पर्यटन स्थळाबाबत आस्था निर्माण झालेली असेल तर तो उद्या आपल्या सहकार्यांना, कुटूंबियांना, नातेवाईकांना त्या पर्यटन स्थळावर घेवून येतो. तसेच संशोधकाला सोई-सुविधा-सवलती मिळाल्या तर तो त्या पर्यटन स्थळाविषयी, ऐतिहासिक वारसाविषयी आणखी नविन संशोधन करून माहिती प्रकाशित करेल. ती नविन माहिती वाचून ते वाचक पर्यटक म्हणून त्या स्थळांना भेटी देण्यासाठी येतील. आणि आपोआप पर्यटन विकास होईल.

९) पर्यटकांच्या आवडी निवडी वेगवेगळ्या असतात कांही पर्यटक समुद्र किनाऱ्यावर आनंद लुटण्यासाठी येतात. कांही जलसंचार करण्यासाठी येतात. कांही धबधबे पाहण्यासाठी येतात. कांही मासे व इतर जलीय प्राण्यांच्या मेनूचे आस्वाद घेण्यासाठी येतात तर सरकारने त्यांचा विकास करण्याकडेही लक्ष दिले पाहिजे. सध्याच्या युगात जलीय स्त्रोतांकडे पर्यटकांचा लोंढा जास्त आहे. म्हणून त्यांचा विकास करण्यासाठी सरकारसोबत स्थानिय लोकही पूढे आले पाहिजे. खाजगी संस्था आणि संघटनाही पुढे आल्या पाहिजे.

१०) पर्यटकांना आपल्याकडे आकर्षीत करण्यासाठी पर्यटन स्थळ परिसरात असलेल्या कलांचा विकास आणि त्याची जाहीरातबाजी होने अत्यंत आवश्यक आहे कारण पर्यटन स्थळी आलेल्या पर्यटकांचे त्यातून मनोरंजन होते. त्या परिसरातील नाविण्यपूर्ण वस्तू आपल्या घरी घेवून जाण्याची लालसा त्यांच्या मनात निर्माण होते. म्हणून सरकारने, स्थानीय लोकांनी, खाजगी संस्था व संघटनांनी अशा अनेक स्थानीय कलांची कलाकेंद्रे निर्माण केली पाहिजे. त्या परीसरातील विविध कलाकारांच्या कलांना प्रोत्साहान दिले पाहिजे. त्या परिसरातील लोकवाद्ये, लोकगीते यांचे पर्यटकांसाठी सादरीकरण झाले पाहिजे. त्या कलांचे सादरीकरण आकर्षक, मनोरंजक होण्यासाठी कलाकारांचे प्रशिक्षण वर्ग, सराव वर्ग, चालूच ठेवले पाहिजे म्हणजे त्या कला पाहून, कलात्मक वस्तु खरेदी करून पर्यटक आनंदी होईल. त्यातून पर्यटनाचा विकास निश्चीतच होईल.

११) पर्यटनाचा विकास होण्यासाठी पर्यटनाचे नियोजन व समुह पर्यटन होनेही अत्यंत आवश्यक आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात अनेक पर्यटन स्थळे आहेत. त्याबाबत अनेक प्रवाशी संस्था, रेल्वे विभाग, राज्यसरकारांचे, केंद्रसरकारांचे पर्यटन विभाग पर्यटकांसाठी चारधाम यात्रा, बाराज्योतिलींग यात्रा, अष्टविनायक दर्शन इत्यादी अनेक पर्यटन नियोजन करतात. पण त्यांच्या फिसबाबतचे आकडे पाहिले तर सामान्य मानसांच्या बजेटमध्ये ते बसतच नाही. सामान्य मानसाला ती पर्यटन स्थळे पाहण्याची मनात इच्छा असते पण नाईलाज होतो. म्हणून पर्यटन विभागाने कांही माफक दरात तशा लोकांना पर्यटन स्थळापर्यंत आकर्षीत करून आणता येईल का याचा विचार केला पाहिजे. कारण पर्यटन स्थळाची जाहीरात करण्यासाठी हा वर्ग अत्यंत महत्वाचा आहे. त्यांच्याद्वारे दिली जाणारी माहिती व्यापक असते. समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत ती माहिती पोहोचते. त्यामुळे आणखी पर्यटक वाढतात. त्या पर्यटन स्थळाकडे लोक आकर्षीत होतात त्यातून निश्चीतच पर्यटनाचा विकास होतो. हे अमान्य करताच येत नाही.

अशाप्रकारे पर्यटनाचा विकास करायचा असेल तर उपरोक्त बाबींचा व्यापक दृष्टीकोणातून विचार झालाच पाहीजे याशिवायही इतर अनेक बाबी पर्यटन विकासासाठी आवश्यक असू शकतात. हया पर्यटन विकासातून राष्ट्राचा विकास होतो. परकिय चलन व भारतीय चलन वाढते आणि पैसा व्यवहारात येतो.

**पर्यटन विकासाचे फायदे :**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 24 , Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

९) संपूर्ण भारत के सांस्कृतिक एवं धार्मीक पर्यटन स्थळ, राजकरन यादव, रावत प्रकाशन - २०१३
१०) पर्यटन विकास, रेणू कथुरिया, नेहा पब्लीशर अॅन्ड डिस्ट्रीब्युटर, २०१३
११) पर्यटन भुगोल, शैलजा सांगळे, डायमंड पब्लीकेशन पूणे, २०१५
१२) पर्यटन उद्भव एवं विकास, डॉ. राजेंद्र कुमार व्यास, राजस्थान हिन्दी ग्रंथ अॅकेडमी - २०१८
१३) समग्र विकास एवं पर्यटन, मंजू पांडेय, मेधा पब्लीकेशन हाऊस, २०१६
१४) पर्यटन उत्पादन, मनोज दिक्षीत, न्यु रॉयल बुक्स कंपनी, २०१५
१५) पर्यटन एक संजीवनी, डॉ. लिलि जोशी, रोहन प्रकाशन, २०१३
१६) पर्यटन सिध्दांत ओर प्रबंधन तथा भारत में पर्यटन, शिवस्वरूप सहाय, मोतीलाल बनारसीदास पब्लीशर्स, २००६
१७) भारत मे पर्यटन उद्योग की नविन प्रकृतियाँ एवं आर्थिक विकास, जगन्नाथ रजक, नरेंद्र शुक्ल, अध्ययन पब्लीशर्स, २०११
१८) पर्यटन प्रबंधन, सिध्दांत और व्यवहार, किशोर सिंग, डॉ.ए.के. रैना, अभिनव प्रकाशन, २००७

**Dr. Anil Chidrawar**
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded